साप्ताहिक

''एकच ध्येय... एकच आवाज''

PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक - संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक २६ वा | सोमवार, दि. १३/०७/२०२६ ते दि. १९/०७/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

## जागतिक मराठी परिवार महाराष्ट्राच्या विकासाचा महत्त्वाचा भागीदार

# जगभरातील मराठी समाजाशी नाते दृढ करण्यासाठी शासन कटिबद्ध-राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल

मुंबई - जगभरातील मराठी समाज हा महाराष्ट्राच्या विकासाचा महत्त्वाचा भागीदार असून त्यांचे ज्ञान, अनुभव, जागतिक संपर्क आणि गुंतवणूक राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मोलाची ठरणार आहे. त्यामुळे जगभरातील मराठी परिवाराशी अधिक परिणामकारक, सातत्यपूर्ण आणि संस्थात्मक संबंध प्रस्थापित करण्यासाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन राजशिष्टाचार व पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केले. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे आयोजित 'मध्यपूर्व आणि आफ्रिका डायस्पोरा आउटरीच' या ऑनलाईन संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राजशिष्टाचार विभागाचे सचिव डॉ. राजेश गवांदे, विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच संयुक्त अरब अमिराती, सौदी अरेबिया, कतार, ओमान, बहरीन, कुवेत, दक्षिण आफ्रिका, केनिया, नायजेरिया, युगांडा आदी देशांतील महाराष्ट्र मंडळांचे पदाधिकारी आणि प्रतिनिधी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. राजशिष्टाचार व पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून राजशिष्टाचार विभागाकडे थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) तसेच डायस्पोरा अफेअर्स अँड आउटरीच या नव्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. या माध्यमातून जगभरातील महाराष्ट्राच्या परिवाराशी दृढ, सातत्यपूर्ण आणि परिणामकारक संबंध निर्माण करण्याचे काम सुरू असून जागतिक मराठी समाजाला राज्याच्या विकास प्रक्रियेत सक्रिय भागीदार म्हणून जोडण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

महाराष्ट्राची ताकद केवळ राज्याच्या भौगोलिक सीमांमध्ये नसून जगभर आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्राचा गौरव वाढविणाऱ्या प्रत्येक मराठी व्यक्तीमध्ये असल्याचे सांगून त्यांनी उद्योग, व्यापार, आरोग्य, शिक्षण, तंत्रज्ञान, वित्त, संशोधन आणि उद्योजकता अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मराठी बांधवांचे अभिनंदन केले. परदेशात राहूनही मराठी भाषा, साहित्य, संस्कृती आणि परंपरा जतन करणाऱ्या महाराष्ट्र मंडळे व सामाजिक संस्थांच्या कार्याचेही मंत्री रावल यांनी कौतुक केले. मध्यपूर्वेतील सध्याच्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर तेथील मराठी बांधवांच्या सुरक्षिततेबाबत महाराष्ट्र शासन संवेदनशील असल्याचे सांगून सर्वांनी स्थानिक प्रशासनाच्या सुरक्षा सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले. संयुक्त अरब अमिरातीतील इंडियन पीपल्स फोरम महा हेल्पलाइनने संकटाच्या काळात सुमारे १,२०० भारतीय पर्यटकांना सुरक्षितपणे मायदेशी परतण्यास मदत केल्याबद्दल संबंधित संस्था आणि स्वयंसेवकांचे मंत्री रावल यांनी विशेष अभिनंदन केले. आफ्रिका खंडातील काही भागांमध्ये इबोला आणि इतर संसर्गजन्य आजारांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी स्थानिक प्रशासन आणि आरोग्य यंत्रणांच्या सूचनांचे पालन करून स्वतःची व कुटुंबीयांची काळजी घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.



राज्यात उद्योग, पायाभूत सुविधा, कृत्रिम बुद्धिमत्ता, हरित ऊर्जा, लॉजिस्टिक्स, पर्यटन, कृषी, अन्न प्रक्रिया आणि स्टार्टअप्स या क्षेत्रांत वेगाने प्रगती होत असल्याचे सांगून महाराष्ट्राला केवळ आर्थिक गुंतवणूक नव्हे, तर जागतिक मराठी समाजाचे ज्ञान, अनुभव, कौशल्य आणि जागतिक संपर्क जाळेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकार होत असलेला 'महाएनआरआय कनेक्ट' हा उपक्रम जगभरातील मराठी समाजाला महाराष्ट्र शासनाशी जोडणारे प्रभावी डिजिटल व्यासपीठ ठरणार असून गुंतवणूक, उद्योग, ज्ञानाची देवाणघेवाण, सांस्कृतिक आदानप्रदान आणि शासनाशी थेट संवादासाठी त्याची महत्त्वपूर्ण भूमिका राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. मागील आठवड्यात अमेरिकेतील मराठी बांधवांशी संवाद साधल्यानंतर आता मध्यपूर्व आणि आफ्रिका खंडातील मराठी समाजाशी संवाद साधण्याची संधी मिळाल्याचा आनंद व्यक्त करत त्यांनी हा संवाद यापुढेही नियमितपणे सुरू राहील, अशी ग्वाही दिली. महाराष्ट्र शासनाला जगभरातील मराठी समाजाशी केवळ संपर्क ठेवायचा नसून कायमस्वरूपी, विश्वासाचे आणि विकासाभिमुख नाते निर्माण करायचे असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमात मध्यपूर्व आणि आफ्रिका खंडातील विविध महाराष्ट्र मंडळांच्या प्रतिनिधींनी आपले अनुभव, सूचना आणि अपेक्षा व्यक्त केल्या. शासनाशी सातत्यपूर्ण संवाद आणि अधिक समन्वयाची अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

# शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाच्या पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष पदी अरुण कोळी यांची निवड

मुंबई - महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ भाई शिंदे यांच्या आदेशानुसार व शिवसेनेचे मुख्य सचिव संजय मोरे, खा .डॉ . श्रीकांत शिंदे, प्रशांत पालांडे, यांच्या मागदर्शनाखाली ओबीसी नेते तथा शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाचे प्रदेश अध्यक्ष ॲड. डॉ पी बी कुंभार यांच्या नेत्तृत्वाखाली व यांच्या सही निशी शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाच्या पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष पदी अरुण कोळी यांची नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली . यावेळी सचिव रविंद्र होळकर, परभणी जिल्हाध्यक्ष मदन रेनगडे व प्रसाद कोळी आदि ची उपस्थित होती. पंढरपूर येथील रहिवासी अरुण कोळी हे वयाच्या १६ व्या वर्षा पासून शिवसेना पक्षात कार्यरत होते. राजकिय, सामाजिक कार्याची दखल घेवून त्यांना नियुक्ती पत्र प्रदेशाध्यक्ष ॲड . डॉ पी बी कुंभार यांच्या सही निशी देण्यात आले असून या नियुक्ती पत्रावर वंदनीय हिंदू हृदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण याचा आपण सक्रियपणे प्रचार प्रसार कराल व तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी आपण सर्व घटकांना सोबत घेऊन संघटन वाढवून कार्य कराल असा विश्वास व्यक्त करूण आपणास पुढील कार्यास शुभेच्छा देतेत असा उल्लेख नियुक्ती पत्रात



केलेला आहे या निवडी बद्दल राज्य संपर्क प्रमुख अनिल धमने पाटील, सोशल मिडीया राज्यप्रमुख संजय कुसळकर यांच्यासह आदिंनी त्यांच्यावर शुभेच्छा चा वर्षाव केला आहे .

# शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी ३१ जुलैपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

धुळे (जिमाका) - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिपत्याखालील डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, भाडणे ता.साक्री जि.धुळे या वसतिगृहात शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी शालेय, कनिष्ठ महाविद्यालय, वरीष्ठ बिगरव्यावसायिक महाविद्यालय व व्यावसायिक महाविद्यालयातील अभ्यासक्रमासाठी वसतिगृह प्रवेशासाठी ३१ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावे, असे आवाहन भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहाचे गृहपाल मनोज पाटील यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिपत्याखालील मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, भांडणे ता.साक्री जि.धुळे येथे शैक्षणिक वर्ष सन २०२६-२०२७ वर्षासाठी अनुसूचित जाती ८५ टक्के, अनुसूचित जमाती ३ टक्के, विमुक्त जाती भटक्या जमाती ५ टक्के, एस.बी.सी २ टक्के, आर्थिकदृष्ट्या इतर मागास प्रवर्ग ५ टक्के व विशेष मागास प्रवर्ग २ टक्के याप्रमाणे आरक्षित जागानुसार रिक्त जागेवर प्रवेश देण्यात येणार आहे. ही प्रवेश प्रक्रिया गुणवत्तेनुसार व प्रवर्गनिहाय रिक्त जागानुसार होणार आहे. प्रवेशित विद्यार्थ्यांना मोफत निवास, भोजन, निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य सोयी सुविधा देण्यात येईल. विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशासाठी https://hmasnew.mahait.org/ या संकेतस्थळावर ३१ जुलै, २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करुन शासकीय वसतिगृहाचा लाभ घ्यावा, असे आवाहन गृहपाल श्री. पाटील यांनी केले आहे.

# शाहीर अण्णाभाऊ साठे

**विशेष लेख...**

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे थोर, ख्यातनाम मराठी साहित्यिक. अण्णाभाऊंचा जन्म सांगली जिल्ह्यातील वाटेगावचा, उपेक्षित समजल्या गेलेल्या मातंग समाजातील. त्यांच्या वडिलांचे नाव भाऊ सिधोजी साठे, तर आईचे नाव वालबाई होते. त्यांचे मूळ नाव तुकाराम. जन्मस्थळ वाटेगाव (ता. वाळवा जि. सांगली). त्यांचे शालेय शिक्षण झालेले नव्हते; तथापि त्यांनी प्रयत्नपूर्वक अक्षरज्ञान मिळविले. १९३२ साली वडिलांसोबत ते मुंबईला आले. चरितार्थासाठी कोळसे वेचणे, फेरीवाल्यांच्या पाठीशी गाठोडे घेऊन हिंडणे, मुंबईच्या मोरबाग गिरणीत झाडूवाला म्हणून नोकरी, अशी मिळतील ती कामे त्यांनी केली. मुंबईत कामगारांचे कष्टमय, दुःखाचे जीवन त्यांनी पाहिले. कामगारांचे संप, मोर्चे पाहून त्यांचा लढाऊपणाही त्यांनी अनुभवला. १९३६ मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या प्रभावाखाली आल्यावर ते कम्युनिस्ट पक्षाचे क्रियाशील कार्यकर्ते झाले. मुंबईत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून ते स्वातंत्र्यवीर सावरकरांपर्यंत अनेक नेत्यांची भाषणे त्यांनी ऐकली. पक्षाचे कामही ते करीत होतेच, तथापि वडिलांच्या निधनानंतर कुटुंबाची सगळी जबाबदारी अंगावर पडल्याने ते पुन्हा आपल्या गावी आले. तेथे बापू साठे या चुलतभावाच्या तमाशाच्या फडात ते काम करू लागले. तमाशातून जुन्या चालीचा सुरवातीचा साठा अण्णाभाऊंनी आत्मसात केला. मुंबईत परतताच त्यांना मॅक्झिम गोर्कीचे साहित्य वाचायला मिळाले. लिखाणाची उर्मी त्यांना याच साहित्यानं दिली. तो काळ १९४२ च्या चळवळीचा. ते स्वातंत्र्य समरांगणात सहभागी झाले, म्हणून इंग्रज सरकारने त्यांच्यावर पकड वारण्ट काढले. पोलिसांना चुकवीत ते मुंबईला आले, त्याच काळात त्यांची भेट शाहीर अमर शेख, द. ना. गव्हाणकरांशी झाली. आपसातले हेवेदावे, गरीब जनतेला, शेतकऱ्यांना मिळणारा, छळणारा दारिद्र्याचा झगडा त्यांनी न्याहाळला होता. त्यातच मॅक्झिम गोर्कीच्या साहित्यानं प्रभावित झालेल्या त्यांच्या अंतरीच्या उर्मी प्रतिभेला बहर आला. त्यावेळी अमर शेख या ख्यातनाम मराठी लोकशाहीरांबरोबर अण्णाभाऊंचेही नाव लोकशाहीर म्हणून गाजू लागले. त्यांनी लिहिलेला 'स्तालिनग्राडचा पवाडा' १९४३ साली पार्टी या मासिकात प्रसिद्ध झाला. त्यांनी १९४४ साली शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने' लाल बावटा' कलापथक स्थापन केले. या कलापथकावर सरकारने बंदी घातली. 'अमळनेरचे अमर हुतात्मे' आणि 'पंजाब-दिल्लीचा दंगा' या त्यांच्या काव्यरचना १९४७ साली प्रसिद्ध झाल्या. 'पंजाब-दिल्लीचा दंगा' या रचनेत सर्व प्रागतिक शक्तींना एकत्र येऊन शांतता प्रस्थापित करण्याचे आवाहन त्यांनी केले होते.

वर्गीय क्रांतीची उकल करण्यासाठी त्यांनी तमाशाचा बाज नेमकेपणानं उचलला. तमाशातल्या नृत्यांगनेचे चाळ काढून टाकले आणि वीररसाच्या अंगाराचे चाळ चेतावणारा बंडखोर बंडागळी उभा केला. जुन्या कथेचा ढाचा ठेऊन नव्या युगाचा अकलेचा मोर्चा बांधला. तमाशात परंपरेने चालत आलेला गण बदलून टाकला. त्याजागी श्रमशक्तीला अभिवादन करणारा गण मोठ्या तडफेनं साकारला. आरंभलाच खऱ्या-खोट्याचे कोडे घालून सामान्यातल्या सामान्य माणसाचं कुतूहल वाढवीत त्यांनी आदिवासींची, कोळी-भिल्लांची, मांग-महार, रामोशांच्या व्यथा वेदनांचा हुंकार शाहिरीच्या लोकबाजातून कथा-कादंबऱ्यांतून मांडला.

अण्णाभाऊंनी अन्यायाविरुद्ध झगडणाऱ्या महाराष्ट्राच्या परंपरेचं स्मरण देऊन, संयुक्त महाराष्ट्र आंदोलनासाठी उभ्या महाराष्ट्राला प्रेरणा दिली. शाहीर अमरशेख, शाहीर गव्हाणकरांसमवेत माझी मैना गावावर राहिली, माझ्या जीवाची होतेया कायली ही लावणी अजरामर केली.

अकलेची गोष्ट (१९४५), देशभक्त घोटाळे (१९४६), शेटजींचे इलेक्शन (१९४६), बेकायदेशीर (१९४७), पुढारी मिळाला (१९५२), लोकमंत्र्यांचा दौरा (१९५२) ही त्यांची काही लोकनाट्य होत. अण्णाभाऊंनी पारंपरिक तमाशाला आधुनिक लोकनाट्याचे रूप दिले. अण्णाभाऊंच्या साहित्यात त्यांची कथा-कादंबरीची निर्मितीही ठळकपणे नजरेत भरते. जिवंत काडतूस, आबी, खुळवाडी, बरबाद्या कंजारी (१९६०), चिरानगरची भुतं (१९७८), कृष्णाकाठच्या कथा हे त्यांचे काही कथासंग्रह. त्यांनी पस्तीस कादंबऱ्या लिहिल्या. चित्रा (१९४५) ही त्यांची पहिली कादंबरी. त्यानंतर ३४ कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. त्यांत फकिरा (१९५९, आवृ.१६- १९९५), वारणेचा वाघ (१९६८), चिखलातील कमळ, रानगंगा, माकडीचा माळ (१९६३), वैजयंता ह्यांसारख्या कादंबऱ्यांचा समावेश होतो. त्यांच्या फकिरा ह्या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. वास्तव, आदर्श आणि स्वप्नरंजन यांचे मिश्रण त्या कादंबरीत आहे. सत्प्रवृत्तीचा, माणुसकीचा विजय हे अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यांचे मुख्य सूत्र होय. त्यांच्या काही कादंबऱ्यांवर चित्रपटही निघाले वैजयंता (१९६१, कादंबरी वैजयंता), टिळा लावते मी चिखलातील कमळ), वारणेचा वाघ (१९७०, कादंबरी रक्ताचा (१९६९, कादंबरी आवडी), डोंगरची मैना (१९६९, कादंबरी माकडीचा माळ), मुरली मल्हारीरायाची (१९६९, कादंबरी - वारणेचा वाघ), अशी ही साताऱ्याची तऱ्हा (१९७४, कादंबरी अलगूज), फकिरा (कादंबरी फकिरा). या शिवाय इनामदार (१९५८), पेंग्याचं लगीन, सुलतान ही नाटकेही त्यांनी लिहिली.

अण्णाभाऊ साठे हे देशातील उपेक्षित लोक जीवनाच्या अनुभवाचे साठे ठरले. गोर-गरीब शेतकरी, शेतमजूर, श्रमिक, दलित, पददलितांचा व्यथा-वेदना कथा कादंबऱ्यांमधून प्रकर्षाने उमटाव्यात त्यांची अशी धारणा होती. अण्णाभाऊंच साहित्य देशाबाहेर अगदी पोलंड, रशियातही लोकप्रिय झालं. जनमानसात प्रसिद्ध पावलं अण्णाभाऊंच्या मते ग्रामीण जीवन टिकाऊ काया आहे, तर शहरी जीवन दिलखुलास आहे. महात्मा फुले, शाहू महाराज, आगरकर, लोकहितवादी, महर्षी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजक्रांतीचा ग्रामीण दलित जीवनातच पाया आहे आणि त्याच पायावर लिहिलेल्या अण्णा भाऊंच्या कथा-कादंबऱ्या ही साहित्यक्षेत्रात समाज संक्रमणाची पहिली किमया आहे. अत्यंत अल्पशिक्षित असला तरी उपजत शाहिराला चिंतनाची जोड आणि वैश्विक कार्याची जोड असेल तर तो अजोड साहित्यिकही होऊ शकतो, हे अण्णा भाऊंनी दाखवून दिले. अण्णाभाऊंची लेखणी धारदार होती. पृथ्वी



शेषाच्या मस्तकावर तारली नसून ती श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे, असं ते म्हणत. यांच्या लेखनाचा प्रेरणास्त्रोत सोशीत-उपेक्षितच होता.

अण्णा भाऊंची निरीक्षण शक्ती अत्यंत सूक्ष्म आहे. नाट्यमयता हाही त्यांच्या लेखनशैलीचा आगळा-वेगळा गुण. ज्या उपेक्षितांच्या जीवनातून अण्णाभाऊंनी अनुभूती घेतली, त्यातील क्षणाचा वेग आणि आवेग त्यांच्या लेखनात जाणवत राहतो. लेखनातील लवचिक भावचित्रे अंगासरशा मोडीने साकार करण्याची त्यांची लकबही स्वतंत्र आहे. लेखन शैलीवर त्यांनी सर्वस्व अर्पण केलं होतं.

रशियाच्या इंडो-सोव्हिएत कल्चरल सोसायटी च्या निमंत्रणावरुन ते १९६१ साली रशियात गेले. त्यांवर त्यांनी लिहिलेले प्रवासवर्णन लोकप्रिय झाले. त्यांचे व्यक्तिमत्व विविध कलागुणांनी भरलेले होते. ते उत्तम अभिनय करीत. हातात डफ घेऊन शाहिरी कवने मोठ्या तडफेने गात. बुलबुल, बासरी, हार्मोनियम अशी वाद्येही ते वाजवीत. दांडपट्टा फिरवीत. शिवाय स्वतःच्या लिखाणाव्यतिरिक्त त्यांनी नवयुग, युगांतर आणि आचार्य अत्रेंच्या मराठा वर्तमान पात्रातून अनेक लेख व पुस्तकांची परीक्षणे लिहिली.

अण्णाभाऊंच्या शेवटच्या काळ मात्र हलाखीत गेला. दारिद्र्य आणि एकाकी आयुष्य त्यांच्या वाट्याला आले. मराठी साहित्यातील प्रतिष्ठानकडून त्यांची तशी उपेक्षाच झाली. विपन्नावस्थेत गोरेगावच्या सिध्दार्थनगरात त्याचं निधन झाले.

अनेक विद्यापीठातून अण्णाभाऊंवर अनेक प्रबंध सिद्ध केले आहेत. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांवर केवळ भारतीयच नव्हे, तर २२ परकीय भाषांत भाषांतरे झाली आहेत.

# शाळा परिसरात 'स्टिंग' एनर्जी ड्रिंकवर बंदी; आमदार सत्यजीत तांबे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

## राज्यात शाळांच्या ५०० मीटर परिसरात उच्च कॅफिनयुक्त 'स्टिंग'सारख्या ऊर्जा पेयांच्या विक्रीवर बंदीचे निर्देश

मुंबई - विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने गंभीर ठरू शकणाऱ्या 'स्टिंग'सारख्या उच्च कॅफिनयुक्त ऊर्जा पेयांच्या विक्रीवर शाळांच्या ५०० मीटर परिसरात बंदी घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्यात घेण्यात आला आहे. हा निर्णय प्रत्यक्षात येण्यासाठी विधानपरिषदेत ठाम भूमिका घेत आमदार सत्यजीत तांबे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. या संपूर्ण मुद्द्यावर बोलताना आमदार सत्यजीत तांबे यांनी वारंवार विधानपरिषदेत स्पष्टपणे मांडले की शाळा परिसरात अशा प्रकारच्या 'हाय कॅफिन' आणि आकर्षक पॅकेजिंग असलेल्या पेयांची सहज उपलब्धता ही विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरत आहे. शालेय वयातील मुलांमध्ये अशा पेयांचे वाढते सेवन चिंताजनक असून, यावर तातडीने निर्बंध आवश्यक आहेत, अशी ठाम भूमिका त्यांनी सभागृहात घेतली होती. त्यांच्या सातत्यपूर्ण आणि आक्रमक पाठपुराव्यामुळे या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधले गेले. तांबे यांनी हा मुद्दा केवळ एका चर्चेपुरता मर्यादित न ठेवता अनेक वेळा सभागृहात उपस्थित करत धोरणात्मक निर्णयाची मागणी लावून धरली. शाळांच्या परिसरात आरोग्यास हानिकारक ठरणाऱ्या उत्पादनांची विक्री रोखण्यासाठी स्पष्ट नियमावली तयार करण्याची मागणीही त्यांनी सातत्याने केली होती.

अखेर या मागण्यांना यश मिळत शाळांच्या ५०० मीटर परिसरात 'स्टिंग'सारख्या ऊर्जा पेयांच्या विक्रीवर बंदीचे निर्देश देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे. या संदर्भात मंत्री नरहरी झिरवळ यांनी संबंधित निर्देश दिल्याची माहिती आहे. या निर्णयाचे विद्यार्थी, पालक आणि शिक्षण क्षेत्रातून स्वागत होत आहे. दरम्यान, अशा प्रकारच्या पेयांवर केवळ शाळा परिसरापुरती मर्यादा न ठेवता राज्यस्तरावर कठोर आणि सर्वसमावेशक धोरण आखण्यात यावे, अशीही मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी अधोरेखित केली आहे.

आमदार सत्यजीत तांबे यांनी सातत्यपूर्ण केलेल्या पाठपुराव्याची नोंद -

दि. १२ जुलै २०२४ रोजी पावसाळी अधिवेशनात आवाज उठवला.

दि. ११ सप्टेंबर २०२४ रोजी यासंदर्भात अन्न व औषधे प्रशासन विभागाच्या तत्कालीन मंत्री महोदयांना पत्र लिहून शाळांच्या परिसरातील कॅफेनयुक्त पदार्थांच्या विक्रीबाबत बैठक आयोजित करण्याची मागणी केली.

दि. २३ जानेवारी २०२५ रोजी अन्न व औषध विभागाचे मा. मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली.

दि. २९ जानेवारी २०२५ रोजी अन्न व औषध विभागाचे मा. मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक पार पडली, या बैठकीत एनर्जी ड्रिंक्सवरील संभाव्य धोरण, जनजागृती अभियान आणि निर्बंध लागू करण्याच्या उपाययोजना यावर सविस्तर चर्चा झाली. दि. १ जुलै २०२५ रोजी पावसाळी अधिवेशनात स्टिंगसारख्या घातक एनर्जी ड्रिंक्सवर बंदी घालण्यात यावी, यासाठी पुन्हा एकदा आवाज उठवण्यात आला.

### 'राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक-कलाकार सन्मान योजना' ज्येष्ठ कलावंतांना सन्मानाने जगण्याचा आधार

# सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत १ ते ३१ जुलैदरम्यान ऑनलाइन अर्ज प्रक्रिया ; पात्र ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना दरमहा ५ हजार रुपये मानधन

मुंबई – महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक–कलाकार सन्मान योजना' अंतर्गत कला व साहित्य क्षेत्रात दीर्घकाळ उल्लेखनीय योगदान देणाऱ्या १०० ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना दरमहा ५,००० रुपये मानधन प्रदान करण्यात येणार आहे. या योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांनी दि. १ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत 'आपले सरकार' पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत करण्यात आले आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी सामाजिक न्याय, समता आणि सर्वसमावेशक विकासाची दिलेली प्रेरणा जपत, आयुष्यभर कला आणि साहित्य क्षेत्रासाठी योगदान देणाऱ्या ज्येष्ठ कलावंतांना आर्थिक आधार व सन्मान मिळावा, या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत आहे. सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांच्या योगदानाचा गौरव करून त्यांना सन्मानपूर्वक जीवन जगण्यास सहाय्य करणे, हा या योजनेमागील प्रमुख हेतू आहे.

या योजनेसाठी अर्जदाराचे वय ५० वर्षांपेक्षा अधिक असणे आवश्यक असून दिव्यांग कलाकारांसाठी वयोमर्यादेत १० वर्षांची शिथिलता देण्यात आली आहे. त्यामुळे दिव्यांग अर्जदारांसाठी किमान वय ४० वर्षे निश्चित करण्यात आले आहे. अर्जदाराचे कला अथवा साहित्य क्षेत्रातील किमान १५ वर्षांचे योगदान आवश्यक असून वयाने ज्येष्ठ असलेले विधवा, परित्यक्ता आणि दिव्यांग कलाकारांना प्राधान्य देण्यात येणार आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न ६० हजार रुपयांपेक्षा अधिक नसावे. तसेच ज्यांची उपजीविका प्रामुख्याने कलेवर अवलंबून असून अन्य कोणतेही उत्पन्नाचे साधन उपलब्ध नाही, अशाच पात्र कलाकारांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. केंद्र किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही नियमित मासिक पेन्शन अथवा महामंडळाच्या निवृत्तीवेतनाचा लाभ घेणारे अर्जदार या योजनेसाठी अपात्र राहतील. अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असणे बंधनकारक आहे. ऑनलाइन अर्ज भरताना वयाचा दाखला, आधार कार्ड, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, प्रतिज्ञापत्र, पती–पत्नीचे संयुक्त छायाचित्र (लागू असल्यास), बँक पासबुक, अपंगत्व प्रमाणपत्र (लागू असल्यास), राज्य अथवा केंद्र शासनाचे संबंधित प्रमाणपत्र (लागू असल्यास), नामांकित संस्था किंवा व्यक्तींचे शिफारसपत्र (लागू असल्यास) तसेच आवश्यक इतर कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. सदर योजना मा. ड. आशिष शेलार, मंत्री (सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास), महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून तसेच मा. डॉ. किरण कुलकर्णी, सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. राज्यातील ज्येष्ठ साहित्यिक आणि कलाकारांच्या कलासाधनेचा सन्मान करून त्यांना सामाजिक व आर्थिक बळ देण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग सातत्याने विविध कल्याणकारी उपक्रम राबवत आहे. पात्र ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांनी अर्जाची अंतिम मुदत लक्षात घेऊन दि. ३१ जुलै २०२६ पूर्वी 'आपले सरकार' पोर्टलवर ऑनलाइन अर्ज सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीराम पांडे, संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केले आहे.

## जिल्ह्यात ११ ते १८ जुलैदरम्यान जागतिक लोकसंख्या दिन; विशेष जनजागृती सप्ताहाचे आयोजन

धुळे (जिमाका) – राज्य कुटुंब कल्याण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन व राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत ११ जुलै २०२६ रोजी जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात येणार असून, ११ ते १८ जुलै २०२६ या कालावधीत जिल्हाभर विशेष जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. यंदाच्या अभियानाचे घोषवाक्य दोन जन्मात अंतर, कुटुंब सुदृढ निरंतर असे असून माता व बालकांचे आरोग्य सुदृढ ठेवणे, सुरक्षित मातृत्वाला प्रोत्साहन देणे तसेच आधुनिक कुटुंब नियोजन साधनांचा स्वीकार वाढविणे हा अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

विशेष जनजागृती सप्ताहात जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे व इतर शासकीय आरोग्य संस्थांमध्ये कुटुंब नियोजनाविषयी समुपदेशन, जनजागृती, गर्भनिरोधक साधनांची उपलब्धता, अंतरा इंजेक्शन, तांबी, प्रसूतीपश्चात तांबी, महिला व पुरुष नसबंदी तसेच इतर आधुनिक कुटुंब नियोजन सेवांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. याशिवाय ग्रामपंचायती, स्थानिक लोकप्रतिनिधी, आशा स्वयंसेविका व आरोग्य कर्मचारी यांच्या सहभागातून विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहेत. अभियानादरम्यान पात्र लाभार्थ्यांची गृहभेटीद्वारे ओळख, समुपदेशन, निश्चित दिवस सेवा, सोशल मीडियाद्वारे जनजागृती, मेळावे, माहितीपत्रकांचे वितरण व विविध माध्यमांतून व्यापक प्रचार–प्रसार करण्यात येणार आहे. तसेच सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये कुटुंब नियोजन साधनांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यातील सर्व पात्र दांपत्यांनी शासकीय आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध असलेल्या सुरक्षित, प्रभावी व विनामूल्य कुटुंब नियोजन सेवांचा लाभ घ्यावा. नियोजित कुटुंब, निरोगी माता आणि सुदृढ बालक ही समाजाच्या सर्वांगीण विकासाची गुरुकिल्ली असल्याने प्रत्येक कुटुंबाने कुटुंब नियोजनाचा सकारात्मक स्वीकार करावा. तसेच आपल्या नजीकच्या शासकीय आरोग्य संस्थेशी संपर्क साधून मोफत कुटुंब नियोजन सेवा व समुपदेशनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बोडके यांनी केले आहे.

## मृग बहार फळपीक विमा योजनेत सहभागी व्हावे ; फळबाग शेतकऱ्यांना कृषी विभागाचे आवाहन

धुळे (जिमाका) – महाराष्ट्र शासनाच्या प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत पुनर्गठित हवामान आधारित फळपीक विमा योजना सन २०२६–२७ अंतर्गत मृग बहारातील अधिसूचित फळपिकांसाठी विमा संरक्षण उपलब्ध करण्यात आले आहे. धुळे जिल्ह्यातील डाळिंब, लिंबू, पेरू, सीताफळ फळपिकांची लागवड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांनी या योजनेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन नाशिक विभागीय कृषि सहसंचालक सुभाष काटकर यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आह.

सध्याच्या बदलत्या हवामानामुळे कमी पाऊस, पावसातील खंड, अतिवृष्टी, जास्त तापमान, आर्द्रता यांसारख्या प्रतिकूल परिस्थितीमुळे फळपिकांचे मोठे नुकसान होत आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा व उत्पादनातील जोखीम कमी व्हावी, यासाठी हवामान आधारित फळपीक विमा योजना अत्यंत उपयुक्त ठरत आहे. या योजनेअंतर्गत हवामान निकषांनुसार पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई दिली जाते.योजनेत सहभागी होण्यासाठी डिजिटल क्रॉप सर्व्हे मध्ये पिकांची नोंद, ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी, आधार संलग्न बँक खाते आणि उत्पादनक्षम फळबाग असणे आवश्यक आहे. तसेच फळबागेचे Geo Tagging करणे बंधनकारक आहे.

पेरु फळपिकासाठी हेक्टरी ५ हजार ९५०,डाळींब पिकासाठी हेक्टरी ६ हजार ४००,लिंबू पिकासाठी हेक्टरी ६ हजार ८०० तसेच सिताफळ पिकासाठी हेक्टरी ५ हजार ९५० विमा हप्ता आहे. शेतकऱ्यांनी विमा प्रस्ताव बँक, आपले सरकार सेवा केंद्र अथवा अधिकृत ऑनलाइन पोर्टलद्वारे सादर करावा. अर्ज करण्याची अंतिम मुदत पेरु, डाळींब व लिंबू पिकासाठी १४ जुलै, २०२६ तर सिताफळ पिकासाठी ३१ जुलै,२०२६ अशी आहे. संबंधित फळपिकानुसार जोखीमस्तर वेगवेगळे असल्यामुळे अधिक माहीतीसाठी आपल्या तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी कार्यालय, सहाय्यक कृषी अधिकारी, उप कृषि अधिकारी किंवा मंडळ कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. फळबाग उभारण्यासाठी अनेक वर्षांचे श्रम व मोठी गुंतवणूक लागते. बदलत्या हवामानामुळे उद्भवणाऱ्या जोखमीपासून संरक्षण मिळविण्यासाठी प्रत्येक पात्र फळबागधारकाने मृग बहार फळपीक विमा योजनेचा लाभ घ्यावा. अंतिम मुदतीची वाट न पाहता त्वरित अर्ज सादर करावा. असे आवाहन नाशिक विभागीय कृषि सहसंचालक सुभाष काटकर यांनी केले आहे.

## गटई कामगारांना स्टॉलचे वाटप

धुळे (जिमाका) – सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल पुरविणे या योजनेअंतर्गत सन २०२९–२०२० वर्षांतील मंजूर झालेल्या ८ लाभार्थ्यांना पत्र्याच्या स्टॉलचे वाटप करण्यात आले. यावेळी समाज कल्याण सहाय्यक आयुक्त देविदास नांदगावकर, प्र.विशेष अधिकारी (शानिशा) योगेश चौधरी, समाज कल्याण निरीक्षक किरण साळुंके, जे.जे.शेख, वरिष्ठ लिपिक संजय चौधरी, राजेश काळे, कल्पेश खैरनार आदी उपस्थित होते.असे सहाय्यक आयुक्त समाज कल्याण प्र.विशेष अधिकारी (शानिशा) श्री.चौधरी यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

### संत श्री गुलाबराव महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

धुळे (जिमाका) – संत श्री गुलाबराव महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. नायब तहसिलदार प्रवीण बागूल यांनी संत श्री गुलाबराव महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन केले. यावेळी नायब तहसिलदार श्रीमती आशा सोनवणे, विजय बावा, सहाय्यक महसूल अधिकारी योगेश जिरे, यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## 'कलान्तर २०२६' कला महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन

धुळे (जिमाका) – भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय व सांस्कृतिक मंत्रालयाच्या सहकार्याने कलान्तर आर्ट फाउंडेशनतर्फे आयोजित 'कलान्तर २०२६' या वार्षिक कला महोत्सवांतर्गत राष्ट्रीय स्तरावरील विविध कला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी १५ ऑगस्ट २०२६ पर्यंत संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे. 'कलान्तर २०२६'चा उद्देश विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता, कलात्मक अभिव्यक्ती, कौशल्य विकास आणि सर्वांगीण शिक्षणाला प्रोत्साहन देणे हा आहे. महोत्सवामध्ये चित्रकला, शिल्पकला, सृजनशील लेखन, गायन, नृत्य आणि अभिनय आदी विविध कला प्रकारांतील राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचा समावेश आहे. स्पर्धेसाठी १ जुलै २०२६ ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत https://kalantarart.org या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन प्रवेशिका सादर करता येतील. 'कलान्तर'च्या महत्त्वपूर्ण उपक्रमांपैकी वार्षिक कला महोत्सव हा एक प्रमुख उपक्रम असून, गेल्या १५ वर्षांत या महोत्सवांतर्गत आयोजित राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाइन स्पर्धांमध्ये देशभरातील लाखो स्पर्धकांनी सहभाग नोंदविला आहे. यामध्ये राज्य मंडळांशी संलग्न शाळा व महाविद्यालये, सांस्कृतिक संस्था, कारागृहे, बालसुधारगृहे, वृद्धाश्रम, महिला निवारा केंद्रे आणि अनाथालये यांचा सहभाग राहिला आहे. जिल्ह्यातील सर्व सरकारी व खासगी शाळा, महाविद्यालये, बालसुधारगृहे, कारागृहे, वृद्धाश्रम, अनाथालये, महिला निवारा केंद्रे तसेच विद्यार्थी आणि कलाप्रेमींनी या राष्ट्रीय कला महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येत आहे. प्रवेशासाठी निवड चाचणी परीक्षा शनिवार २८ नोव्हेंबर,२०२६ प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी सकाळी ११.३० ते १.३० यावेळेत घेण्यात येणार असून अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ जुलै,२०२६ अशी आहे. प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरावेत, असेही जवाहर नवोदय विद्यालयांच्या प्राचार्या श्रीमती. चौधरी यांनी कळविले आहे.

## ‘पंढरीची वारी’ माहितीपटातून महाराष्ट्राच्या चैतन्यमय सांस्कृतिक वारशाचे जागतिक पटलावर दर्शन

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत माहितीपटाचा विशेष खेळ

मुंबई - जातपात- धर्मापलीकडे मानवतेची पताका खांद्यावर घेत... डोळ्यांत विठ्ठल माऊलीच्या भेटीची आर्त ओढ साठवत... टाळ- मृदुंगाच्या गजरात... देहभान हरपत शेकडो मैल चालूनही अलौकिक चैतन्याची प्रचिती अनुभवत आणि माणसा- माणसांत साक्षात विठूरायाचे दर्शन घडविणाऱ्या पंढरीच्या वारीचा विस्मयकारक, अद्भूत आणि भव्य प्रवास आता रुपेरी पडद्यावर एका देखण्या माहितीपटाच्या माध्यमातून अवतरला आहे. ‘पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा’ या माहितीपटाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत विशेष खेळ (प्रीमियर शो) झाला. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि वॉर्नर ब्रदर डिस्कव्हरी वाहिनीने या माहितीपटाची निर्मिती केली आहे. त्याचा प्रीमियर शो येथील आयनॉक्स चित्रपटगृहात काल रात्री झाला. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रवीण दरेकर,व आमदार निरंजन डावखरे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव समृद्धी अनगोळकर, संचालक डॉ. किशोर गांगुर्डे, गोविंद अहंकारी, सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव अजय भोसले, उपसंचालक वर्षा आंधळे आदी या वेळी उपस्थित होते. ‘पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा’ हा माहितीपट २२ मिनिटांचा आहे. मराठी, इंग्रजी, हिंदी, तमीळ, तेलगू, बंगाली, कन्नड, मल्याळम या भाषांमध्ये डबिंग करुन त्याचे डिस्कव्हरीच्या विविध उपग्रह वाहिन्यांवरुन प्रसारण करण्यात येत आहे. त्यात डिस्कव्हरी, डिस्कव्हरी एचडी, टीएलसी, टीएलसी एचडी, ॲनिमल प्लॅनेट, ॲनिमल प्लॅनेट एचडी, इन्व्हेस्टिगेशन डिस्कव्हरी (आयडी), डिस्कव्हरी सायन्स आणि डिस्कव्हरी टर्बो अशा नऊ वाहिन्यांचा समावेश आहे. ‘पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा’ या माहितीपटाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक संचिताचे डिजिटल युगातले एक सदस्तऐवजीकरण करण्यात आले आहे. वारीतील समतेची पाऊलवाट अत्यंत भक्तिभावाने पडद्यावर प्रकट होते. चिखल- माती तुडवत, अबीर-गुलालाची उधळण, रिंगण सोहळ्यात धावणारे अश्व आणि चंद्रभागेच्या तीरावरील अथांग भक्तिसागर... प्रत्येक फ्रेममधून जणू विठ्ठलनामाचा गजर थेट हृदयाचा ठाव घेतो.

महाराष्ट्रात शतकानुशतके चालत आलेल्या या परंपरेचे अंतरंग आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आले आहेत. वारीत सहभागी होणाऱ्या आबालवृद्धांचा निस्सीम विश्वास आणि ‘ज्ञानोबा-तुकाराम’ या मंत्राची ताकद काय असते, याचे जिवंत चित्रण यात पाहायला मिळते. वारीतल्या या लालित्यपूर्ण प्रवासाला माहितीपटाच्या रूपामध्ये बांधून महाराष्ट्राचे हे सांस्कृतिक वैभव जागतिक स्तरावर पोहोचवण्याचे एक स्तुत्य पाऊल या निमित्ताने उचलले गेले आहे. त्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे कौतुक केले आहे.

सांस्कृतिक संचित जगासमोर: मुख्यमंत्री फडणवीस

देशातल्या भक्ती मार्गातली वारी ही सर्वात प्राचीन परंपरा आहे, ती सर्वांना मोठी ऊर्जा देते. धर्म- जात, भाषा, गरीब- श्रीमंत, असा कुठलाही भेद न करता सर्वांना विठूरायाच्या रंगी रंगविणारी माऊलीची ही वारी महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचित आहे. ही परंपरा आणि संचित जगासमोर आले पाहिजे, यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि वॉर्नर ब्रदर डिस्कव्हरी वाहिनीच्या माध्यमातून नेत्रदीपक माहितीपट तयार करण्यात आला आहे. वारीचे उद्दिष्ट काय? त्या मागची प्रेरणा काय? त्यात सहभागी होणाऱ्यांच्या मनातले विचार काय? वारीची पद्धती काय? हा सगळ्यांचा उलगडा या माहितीपटातून होतो. आपण विश्वात्मकेसाठी देवाला साकळे घालणारे लोक आहोत, याची प्रचिती या माहितीपटातून येते, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रसंगी काढले.

# भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. च्या वतीने धुळे जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयात स्वछता पखवाडा कार्यक्रम संपन्न

धुळे - गुरुवार, दिनांक ०९/०७/२६ रोजी धुळे जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालय येथे भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड मुंबई मनमाड बिजवासन पाईपलाईन, धुळे आर ओ यू च्या वतीने भारत सरकारच्या कडून सुरु असलेला स्वछता पखवाडा १ जुलै ते १५ जुलै ह्या कालावधीत स्वछता पखवाडा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी पोलिस अधीक्षक विशाल आंनद, पोलीस उप अधिक्षक ज्ञानेश्वर जाधव, गृहविभाग, भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेडचे आरओयु अधिकारी विपुल ढवळे, भारत पेट्रोलियम कॉ. लि. पाईपलाईन लाईन पर्यवेक्षक संतोष धनराव यांच्यासह पोलीस दलाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. हे उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थितांना स्वच्छते विषयी महत्व पटवून दिले. भारत पेट्रोलियम तर्फे ऑफिस मधील अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक यांना स्वच्छ पाणी पिण्यासाठी ५ वॉटर डिस्पेन्सर बसवण्यात आले. यावेळी पोलीस अधिक्षक यांनी भारत पेट्रोलियम चे अधिकारी व कर्मचाऱ्या चे आभार मानले.




# सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू खरीप हंगाम २०२६ मध्ये शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे

धुळे (जिमाका) - राज्य शासनाने खरीप हंगाम २०२६ साठी सुधारित प्रधानमंत्री पिक विमा योजना सुरु केली आहे. यात जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी योजनेत सहभागी होऊन आपल्या पिकाचा विमा काढावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. राज्यात सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी शासन निर्णय दि. ३ जुलै, २०२६ अन्वये सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू करण्यात आली आहे. या निर्णयानुसार अधिसूचित महसूल मंडळामध्ये चालू वर्षीचे सरासरी उत्पादन उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आल्यास पात्र शेतकऱ्यांना विमा नुकसानभरपाई मिळणार आहे. खरीप हंगामात भात, ज्वारी, बाजरी, नागली, मूग, उडीद, तूर, मका, भुईमूग, तीळ, कारळे, सोयाबीन, कापूस आणि खरीप कांदा या १४ पिकांचा योजनेत समावेश करण्यात आला आहे. अन्नधान्य व कडधान्य पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या २ टक्के, तर कापूस व कांदा या नगदी पिकांसाठी ५ टक्के विमा हप्ता भरुन शेतकरी योजनेत सहभागी होऊ शकतात. योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलै, २०२६ ही अंतिम मुदत असून, केंद्र शासनाच्या https://pmfby.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. तसेच बँका, सामूहिक सेवा केंद्रे किंवा शेतकरी स्वतः ऑनलाइन अर्ज सादर करू शकतात.योजनेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याकडे ॲग्रिस्टॅक नोंदणी क्रमांक (फार्मर आयडी) बंधनकारक आहे. जमिनीची कागदपत्रे, पीक लागवड घोषणापत्र, आधार क्रमांक, आधार संलग्न पेमेंटसाठी आधार क्रमांक बँक खात्यास जोडलेला असावा. शेतकऱ्यांनी आपल्या पिकाची नोंद डिजिटल क्रॉप सर्वे अंतर्गत करणे बंधनकारक आहे. डिजिटल क्रॉप सर्वे मधील पीक व विमा घेतलेले पीक यात तफावत आढळल्यास डिजिटल क्रॉप सर्वेमध्ये नोंदवण्यात आलेले पीक अंतिम गृहीत धरण्यात येईल. तसेच, यात तफावत असल्यास विमा अर्ज रद्द होईल.

चुकीच्या मार्गाने अर्ज करून गैरफायदा घेणाऱ्या लाभार्थ्यांना पुढील पाच वर्षे कृषी योजनांपासून वंचित ठेवण्यात येणार आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी किमान ०.१० हेक्टर क्षेत्र असणे आवश्यक आहे. कर्जदार शेतकऱ्यांनी कर्ज मंजूर करणाऱ्या बँकेमार्फत योजनेत सहभागी व्हावे. सहभाग नको असल्यास विहित मुदतीत बँकेला लेखी कळविणे आवश्यक आहे. सामूहिक सेवा केंद्र धारकांना विमा कंपनीमार्फत प्रति अर्ज ६० रुपये दिले जाणार असल्यामुळे शेतकऱ्यांनी विमा हप्त्याव्यतिरिक्त कोणतेही अतिरिक्त शुल्क देऊ नये, असेही कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.अधिक माहितीसाठी संबंधित विमा कंपनी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, जवळची बँक किंवा १४४४७ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. धुळे जिल्ह्यासाठी एचडीएफसी एर्गो जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड यांची विमा कंपनी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर पिकांचे आर्थिक संरक्षण करण्यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना अत्यंत महत्त्वाची असून, सर्व पात्र शेतकऱ्यांनी ३१ जुलैपूर्वी विमा योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

## जवाहर नवोदय विद्यालयात सहावीत प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज सादर करावेत

धुळे (जिमाका) - पीएम श्री स्कूल जवाहर नवोदय विद्यालय, नकाणे रोड, धुळे येथे शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ मध्ये इयत्ता सहावी वर्गाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी परीक्षा २०२७ साठी ३१ जुलै,२०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावे, असे आवाहन जवाहर नवोदय विद्यालय, धुळे प्राचार्य श्रीमती अनिता चौधरी यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. जवाहर नवोदय विद्यालयात सहावीच्या प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचा जन्म ०१ मे २०१५ पूर्वी ते ३१ जुलै २०१७ नंतर झालेला नसावा. ज्या जिल्ह्यामध्ये जवाहर नवोदय विद्यालय आहे. त्याच जिल्ह्यातील पाचवी वर्गात शिक्षण घेत असलेले (२०२६-२०२७) विद्यार्थी प्रवेश परीक्षेला पात्र समजले जातील. प्रवेश घेतांना उमेदवार तिसरी, चौथी आणि पाचवी उत्तीर्ण असावा व संपूर्ण शैक्षणिक वर्ष हे सरकारी, निमसरकारी अथवा सरकारी मान्यता असलेल्या शाळेतील असावा. प्रवेशासाठी ऑनलाईन अर्जांसाठी विद्यार्थ्यांना ह्हीींिः//परीींवूर.सीं.ळप ही लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे.

जवाहर नवोदय विद्यालयाची वैशिष्ट्ये

प्रत्येक जिल्ह्यात सहशिक्षण निवासी शाळा, मुले व मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहे, निवास, भोजन व शिक्षणाची मोफत सोय, राष्ट्रीय एकात्मतेसाठी स्थलांतर योजना, दहावी व बारावीचे उत्कृष्ट निकाल, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास.

हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय - घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे - ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर - भ्रमणध्वनी - ९४२२७९८०९३ / ९०२८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार - ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)
(या वृत्तपत्रातील लिखाणाशी मालक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)